## चित्रपट - भाग्यरेखा

१९४२ सालच्या चळवळीतील भूमिगत क्रांतिकारकांचे खडतर साहसी जीवन, सामान्यांचा त्यांना मिळालेला सक्रीय, धाडसी पाठिंबा अशी राजकीय पार्श्वभूमी, भाकरी मोर्चा सारखे सामाजिक लढे, आदर्श, ध्येयनिष्ठ प्रेम, मोहाच्या क्षणातून उद्भवलेला कुमारी माता हा पेचप्रसंग आणि "निर्भयतेने जीवन जग" असा संदेश देणारे हे चित्र होते. पटकथा, गीते आणि दिग्दर्शन या जबाबदाऱ्या आठवले यांनी उचलल्या. केशवराव भोळे यांनी श्रीधर पार्सेकर या तरुण संगीतकाराबरोबर आठवल्यांच्या गीतांना संगीताने नटवले. शांता आपटे, बाबुराव पेंढारकर यांसारख्या कसलेल्या कलाकारांसोबत पु.ल.देशपांडे यांनीही या चित्रपटात भूमिका केली होती. तो त्यांचा दुसराच चित्रपट होता.

'भाग्यरेखा' हे चित्र "देव खरा आधार" ही संपूर्ण कुटुंब एकत्रपणे म्हणत असलेली गोड आणि अर्थपूर्ण प्रार्थना, 'माझ्या माहेरी सुखाची सावली ग' हे केवळ भाकरी थापत असताना आपटणाऱ्या हातांच्या तालावरचे साधे सुधे गीत, 'पाटलाच्या पोर जरा जपून जपून' हे खट्याळ प्रेमगीत, 'पाहिजे पोटाला भाकरी' हे क्रांतीगीत आणि 'वीरा झोप सुखे तू घेई' हे शांत अंगाईगीत अशा शांता आपटे यांच्या मधुर आवाजातील गीतांनी नटले होते.

या चित्रातील एका प्रसंगात महर्षी कर्वे आणि तात्यासाहेब केळकर हे दोन दिग्गज सहभागी झाले होते, महर्षी कर्व्यांनी एक छोटासा संवादही म्हटला होता.

## चित्रपट - भाग्यरेखा

### माझ्या माहेरी सुखाची सावली गं

माझ्या माहेरी सुखाची सावली गं
माझ्या माहेरी सुखाची सावली.

कृष्णाबाईचं निर्मळ पाणी
पिके जोंधळा मोत्यावाणी
ओढ्याकाठी आंबराई लवली गं
माझ्या माहेरी सुखाची सावली.

माझ्या आईची माझ्यावर माया
जशी आभाळाची जगावर छाया
प्रेमा पाजिते पावलो पावली गं
माझ्या माहेरी सुखाची सावली.

जसा सूर्याचा पहारा नभी
तशी शेताच्या बांध्यावर उभी
माझ्या बाबांची मूर्ती सावळी गं
माझ्या माहेरी सुखाची सावळी.

माझ्या अंगणी गोठाभर गाई
गोऱ्हे बैलांची गणतीच नाही
ही दौलत सोन्याहून पिवळी गं
माझ्या माहेरी सुखाची सावळी.

पूर्वजन्मात सुकृत केलं
सुख ललाटी आता आलं
माझ्या भक्तीला अंबाबाई पावली गं
माझ्या माहेरी सुखाची सावली.

## चित्रपट - भाग्यरेखा

### देव खरा आधार, दयाघन देव खरा आधार

देव खरा आधार, दयाघन देव खरा आधार
निवांत राही टाकुन अवघा देवावरती भार
दयाघन, देव खरा आधार.

आज उन्हाळा उद्या हिवाळा
सृष्टीनियम हा टळे कुणाला
काळाचे हे चक्र सारखे वरखाली होणार
दयाघन, देव खरा आधार.

सदैव लाभे सुख कवणाला
रघुनंदनही जाई वनाला
तुझेचि संचित तुला भोगणे
ते न कधी टळणार
दयाघन, देव खरा आधार.

आज अमंगल रात्र काजळी
अंधारातुनी याच सकाळी
प्रकाशरूपे प्रभुरायाचा
होईल साक्षात्कार
दयाघन, देव खरा आधार.

## चित्रपट - भाग्यरेखा

### पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन

पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन
अरे, पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन.

मी घेऊन माझी गुरं
जाता येताना शेतावर
आम्बेराईच्या वळणावर
का बसतोस चोरा टपुन टपुन
अरे, पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन.

तुझ्या मळयातल्या विहिरीवर
मी भरताना रे घागर
पाणी उडवून अंगावर
पदराला नको रे धरू लपुन छपुन
अरे, पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन.

कुस्तीचा मारुनी फड,
तू जितून सोन्याचं कडं
येशील मिरवत गावाकडं
रूप बघून जाते राया दिपुन दिपुन
अरे, पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन.

ने प्रीत सख्या शेवटा
झाला गावात लई बोभाटा
लावू नका कुळाला बट्टा
लग्नाआधी राया जरा जपुन जपुन
अरे पाटलाच्या पोरा जरा जपुन जपुन.

## चित्रपट - भाग्यरेखा

### पाहिजे पोटाला भाकरी

पाहिजे पोटाला भाकरी
नव्या युगाची नव्या जगाची
हीच देवता खरी – भाकरी
पाहिजे पोटाला भाकरी.

किसान पिकवी माणिक मोती
देहचंदना मजुर झिजविती
पाऊस थंडी ऊन सोशिती
नसे घराची छाया
ल्याया कपडा अंगावरी
तयांच्या कपडा अंगावरी
पाहिजे पोटाला भाकरी.

गरीबांचे जे रक्त शोषिती
मस्त सुस्त जे आज लोळती
भाकरीच ही करील क्रांती
आणि पटापट घेईल यांचे बळी मेंढरापरी
पाहिजे पोटाला भाकरी.

माणुस म्हणुनि जगा भूमिवर
करा काम अन् मिळवा भाकर
हाच जगाचा धर्म खरोखर
ह्या धर्माची सगळे आपण
धरू पताका वरी
पाहिजे पोटाला भाकरी.

## चित्रपट - भाग्यरेखा

### वीरा, झोप सुखे तू घेई

वीरा, झोप सुखे तू घेई.

या हृदयाच्या हिंदोळ्यावर
प्रीतिफुलांची शैया सुखकर
शांत करि अंगाई
झोप सुखे तू घेई.

प्रीति शांतीचा दाटे परिमल
दुनियेमधले दु:ख अमंगल
इथे पांगळे होई
झोप सुखे तू घेई.

लाख चंद्र जणु हासत आले
अमृतसागर नभी उसळले
विश्व सुखामय होई
झोप सुखे तू घेई.

मायभूमीच्या ऐश्वर्याची
मानवतेच्या मंगलतेची
विशाल स्वप्ने पाही
झोप सुखे तू घेई.